Pune Police

दिनांक ०२/०२/२०१७

## प्रेस नोट

---

# फरासखाना तपास पथकाची कामगिरी

## सराईत गुन्हेगाराकडुन घरफोडीचे गुन्हे उघड

सदर बाबत अधिक माहिती अशी की फरासखाना तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पो स्टे हददीत गस्त घालीत असतांना पोलीस हवालदार संजय गायकवाड यांना खास बातमीदाराने बातमी दिली, पुणे पोलीसांचे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार सध्या पुणे शहरातुन तडीपार असलेला आकाश ऊर्फ छोटया अरुण कांबळे रा. तळजाई माथा पदमावती पुणे हा दुधभट्टी गणेश पेठ पुणे येथे येणार असल्याची बातमी मिळाली. यावरुन त्यास सदर ठिकाणाहुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन घरफोडी करण्याचे साहित्य,लोखंडी कटावणी,स्क्रु ड्रायव्हर असा माल मिळाला. त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने फरासखाना पो स्टे गुन्हा रजि नं.२७०/१६ भा.द.वि क.४५४,४५७,३८० या गुन्हयाची कबुली दिली. त्याप्रमाणे त्याचेकडे अधिक तपास करता त्याने घरफोडी गुन्हयामध्ये आणखी एक साथीदार तेजस पुनमचंद तोष्णीवाल रा.विजापुर कर्नाटक असा असल्याचे सांगितले.यावरुन तेजस तोष्णीवाल याला त्याचे राहते घर विजापुर कर्नाटक येथुन ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे अधिक तपास करता त्या दोघांनी मिळुन पुणे शहरात मागील १ वर्षामध्ये फरासखाना, विश्रामबाग, वारजे माळवाडी, सिंहगड रोड, कोंढवा,बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीतील १० घरफोडी गुन्हे केल्याचे कबुली दिली व दोघांनी सदर गुन्हयातील मुद्देमाल हा आरोपी तेजस तोष्णीवाल याचा चुलत मामा नामे सुरज मोहन दरक रा.बेलापुर श्रीरामपुर रा.अहमदनगर या विकण्यासाठी दिला असल्याचे सांगितल्याने त्यास नमुद गुन्हयामध्ये अटक करुन, वरील तिन्ही आरोपीतांकडुन फरासखाना, विश्रामबाग, वारजे माळवाडी, सिंहगड रोड, कोंढवा,बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीतुन घरफोडी गुन्हयातील ८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किं २,२८,०००/-, १ किलो ७०० ग्रॅम वजनाची चांदीच्या वस्तु, किं ६९,७००/-, रोख रक्कम ५०,०००/- रुपये, ७,०००/- रु किं चे लेडीज ड्रेस मटेरीयल असा एकुण ३,५४,७००/- रु किं चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

यातील आरोपी आकाश ऊर्फ छोटया कांबळे हा सहकारनगर पोलीस स्टेशन येथील सराईत गुन्हेगार असुन त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ -२ पुणे यांचे आदेशान्वये दिनांक ३०/०१/२०१५ रोजी पासुन २ वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे. तसेच तेजस तोष्णीवाल हा मुख्य आरोपी असुन त्याला जेव्हा पैशांची आवश्यकता असायची त्यावेळेस तो पुणे शहरात येवुन घरफोडी गुन्हे करायचा. त्याचे मागावर पुणे शहरातील अनेक पोलीस होते.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग पुणे ,श्री सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व प्रविण कुलकर्णी ,सहा पोलीस आयुक्त शहर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती रेखा साळुंखे, पोलस निरीक्षक(गुन्हे)श्री.राजेंद्र चव्हाण, पोलीस निरीक्षक श्री.जयराम पायगुडे, तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र जाधव, पोलीस कर्मचारी संजय गायकवाड ,ईकबाल शेख, ज्ञानेश्वर देवकर, बापु खुटवड,हर्षल शिंदे, विनायक शिंदे, संदिप पाटील, बाबासाहेब गोरे, शंकर कुंभार, अमोल सरडे, विकास बोऱ्हाडे, सागर केकाण,अमेय रसाळ, यांचे पथकाने केली.